## प्रेस नोट

शासकीय विश्राम गृह, वरुड
जि.अमरावती
दि. २५/०८/२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १).श्रीमती निता करीया वय ५० वर्ष, पद— — पर्यवेक्षिका, वर्ग — ३, एकात्मीक बालविकास प्रकल्प, वरुड जि. अमरावती, २) श्रीमती उषा राउत वय ४८ वर्ष पद — अंगणवाडी सेवीका मानधन तत्वावर, एकात्मीक बालविकास प्रकल्प वरुड, जिल्हा अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०८/०६/२०२० रोजी |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ५,०००/— रुपये |
| ५ | पडताळणी दरम्यान मागणी केलेली लाच रक्कम | पहिला हपता ३,०००/— रुपये दुसरा हपता १०००/— रुपये असे एकुण ४०००/— रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | —— |
| ७ | घटनास्थळ | महेश कॉलनी, वरुड जि. अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हया अंगणवाडी सेविका असुन त्यांनी दिनांक ०५/०६/२०२० रोजी दिलेल्या तक्रारी वरुन दि.०८/०६/२०२० रोजी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे लॉकडाउन कालावधीतील पगार काढुन देण्याकरीता आलोसे क्र.१ यांनी पंच क्र.१ यांचे समक्ष तक्रारदार यांना तडजोडीअंती पहिला हप्ता ३०००/— रुपये व दुसरा हप्ता १०००/— रुपये असे एकुण ४०००/— रुपये लाचेची मागणी केली. तसेच सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.२ यांचे मार्फत लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला व आलोसे क्र.२ यांनी आलोसे क्र.१ यांना लाच रक्कम स्विकारण्यास सहकार्य केले. आलोसे क्र.१ यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने लाच रक्कम स्वीकारली नाही. दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले असून लाच मागणी गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री.श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्रीमती श्वेता मिश्रा, पो.नि.श्रीमती रुपाली पोहनकर, पो.नि.श्री.रविंद्र जेधे , मपोहवा.माधुरी साबळे, पोकॉ. श्री.पंकज बोरसे, श्री.शैलेश कडू, श्री.राजेश कोचे तसेच चालक ए.एस.आय.श्री.सतीश किटूकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागा तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

संपर्क :— अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्र. — १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.

(श्वेता मिश्रा)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

Scanned with CamScanner